(2)

मिरा भाईंदर महानगरपालिका

आ. क्र. ९०८

दि. ३०/६/०५

अंध, अपंग, गटई कामगार यांना टेलिफोन बुथ, आरे सरिता दुध केंद्रासाठी जागा मंजुर करणे-नियमावलीस मंजुरी मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शा.नि. क्रमांक -मिभापा-२००४/१४४८/प्र.क्र.११८/०४/नवि-२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ६ जून, २००५.

वाचा- आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे जा.क्र. मनपा/नर/१२३५/२००४-०५ दि. १७/९/२००४.

**शासन निर्णयः-**

महसूल व वन विभागाच्या दि.२६/४/२००१ च्या शासन निर्णयानुसार अपंगाच्या स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठीचे धोरण विहित केले आहे. त्या विभागाने दि.२४/१/२००३ च्या पत्रान्वये या संदर्भातील बृहतआराखडाही तयार केला आहे. त्यानुसार अंध, अपंग, गटई कामगारांना टेलिफोन बुथ, आरे सरिता दुध केंद्रासाठी जागा मंजुर करणे, यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेल्या नियमावलीस मंजुरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने साकल्याने विचार करून खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या नियमावलीस (अ,ब,क) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (अ) अन्वये मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

१) अंध, अपंग, गटई कामगारांना टेलीफोन बुथ, आरे सरिता दुध केंद्र इत्यादि साठी जागा वाटप करताना आयुक्त दुग्धविकास विभाग, वरळी; महानगर टेलिफोन निगम तथा मुंबई भारत संचार निगम; वाहतूक पोलीस इ. ज्या ज्या प्राधिकाऱ्यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आवश्यक असेल त्या त्या सर्वांकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊनच जागा वाटप करण्यात यावे.

२) या विषयासंदर्भात नव्याने काही न्यायालयीन आदेश प्राप्त झाले असल्यास ते विचारात घेऊन कार्यवाही करावी.

३) नियमावली नुसार जागा वाटप करताना शासनाचे आदेश विचारात घेऊन आरक्षण ठरविण्यात यावे.

सोबत जोडलेल्या नियमावलीतील अटी / शर्ती मध्ये महानगरपालिकेस काही कारणास्तव काही बदल करावयाचा असेल तर या विभागाच्या सहमतीने करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(उ. सं. दांडेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

1-7-05